

# एकविसावे शतक आणि मराठी साहित्य


मुख्य संपादक

डॉ. श्रीधर साळुंके

संपादक

डॉ. संभाजी पाटील

Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 ★ Ta.Sonpeth Dist.Parbhani
शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर
॥ आरोह तमसो ज्योति ॥

शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'सीपीई' योजनेअंतर्गत आयोजि
'मराठी' विषयाचे 'दोनदिवसीय' राष्ट्रीय चर्चासत्रातील
निवडक शोधनिबंधांचा संपादित ग्रंथ

एकविसावे शतक आणि मराठी साहित्य

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. श्रीधर साळुंके
संपादक : डॉ. संभाजी पाटील

ISBN - 978-93-5240-095-9

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
भ्रमणध्वनी : ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क संपादकाधीन

प्रथमावृत्ती : १० एप्रिल २०१७

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षरजुळणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मुखपृष्ठ : सरदार जाधव, औरंगाबाद

मूल्य : ₹ ४०० /-

Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN-978-93-5240-095-9

## विभाग (इ) : २१ वे शतक आणि मराठी कविता


१. २१ व्या शतकातील कवितांचे अंतरंग
**डॉ. शिवाजी जवळगेकर** ....................९७

२. एकविसावे शतक आणि स्त्रीवादी कविता
**डॉ. बालासाहेब काळे** ....................१०२

३. आदिवासी साहित्यचळवळीचे काव्यलेखन : एक अभ्यास
**डॉ. दुष्यंत कटारे** ....................१०८

४. संतोष पवार यांची कविता : वर्तमान संदर्भ
**डॉ. ज्ञानेश्वर राऊत** ....................११२

५. वर्तमान मराठी दलित कविता आणि जागतिकीकरण
**डॉ. मुंजाजी खरात** ....................११७

६. २१ व्या शतकातील स्त्रियांची मूक वेदना : डॉ. वृषाली किन्हाळकरांची कविता
**डॉ. पद्माकर पिटल** ....................१२४

७. मराठी कवितेद्वारा जागतिकीकरण प्रक्रियेचा घेतलेला वेध
**डॉ. दादाराव गुंडरे** ....................१२७

८. २१ वे शतक आणि आदिवासी कविता
**प्रा. नागनाथ बनसोडे** ....................१३४

९. २१ वे शतक आणि दलित कविता
**डॉ. नरसिंग कदम** ....................१३९

१०. २१ व्या शतकात विठ्ठल वाघ यांची कविता आणि प्रतिमा
**डॉ. शिवसांब कापसे** ....................१४३

११. एकविसाव्या शतकात संत तुकारामांच्या अभंगाची प्रासंगिकता
**डॉ. रवींद्र बेम्बरे** ....................१४८

१२. एकविसावे शतक आणि ग्रामीण कविता
**डॉ. माणिक मानकर** ....................१५८

१३. शिक्षणव्यवस्थेतील वर्तमान वास्तव : 'पोरगं शेकत बसलंय'
**डॉ. विष्णू कांबळे** ....................१६२

१४. एकविसाव्या शतकातील ग्रामीण कवितांचे विविधांगी आकलन

G.Sonpeth Dist.Pa

डॉ. बालासाहेब काळे
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ

आधुनिक मराठी कवितेतील अत्यंत महत्वाचा प्रवाह म्हणजे स्त्रीवादी कविता. स्त्रीवाद ही कल्पनाच मुळात पाश्चत्य आहे. स्त्रीवादी चळवळीतून हा प्रवाह उदयास आला आहे. स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासुन फारकत घेऊन स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जी पशुतूल्य अवस्था प्राप्त करुन दिली. त्यातुन बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापीत करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे विचारपीठ आहे. पुरुषाइतकेच महत्वाचे व समान स्थान स्त्रीला सर्व क्षेत्रात मिळण्याची मागणी हा प्रवाह करतो. थोडक्यात स्त्रियांना सर्व प्रकारच्या शोषणातुन मुक्त करणे, हा स्त्रीवादी चळवळीचे प्रमुख ध्येय मानले जाते, तर स्त्रीवादी साहित्यकडे स्त्रीमुक्ती चळवळीला वैचारिक बळ देणारे साधन म्हणून पाहिले जाते.

या दृष्टीकोनातून मराठी कवितेचा विचार करतांना केवळ स्त्रीने लिहिलेली कविता म्हणजे स्त्रीवादी कविता नव्हे. किंवा पुरुषाने स्त्री या विषयावर लिहिलेली कविता हा स्त्रीवादी कविता ठरत नाही. स्त्री हा काव्यविषय असणे तीचे कौतुक, उत्कट प्रेम, देवतेसामान पूजन, निर्भत्सना, पत्नी - आई - गृहिणी या भुमिकेचे गायलेले गोडवे इ. जे घाऊक विषय मराठी कवितेत येतात ते स्त्रीवादी कविता नाकारतो. स्त्रीच्या आदिमाया ते देहास्विनी या दोन्ही टोकाच्या भुमिकांचा धिक्कार करते. या भुमिका केवळ 'बाई' या शारीरिक निकषांवर आधारित आहेत. त्या सामाजिक प्रवाहांपासुन स्त्रीला वंचीत ठेवतात. पुरुषांच्या वर्चस्व गाजविण्याच्या वृत्तीला पोषक ठरत असल्यामुळे स्त्रीवादी कविता ते नाकारते. पुरुषाच्या अधाराविना स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला परिपुर्णता येऊ शकते व प्रेमाइतकच माणसासारखं जगणं ही स्त्रीची भूक आहे. या अनुभवाचे समर्थ अविष्कार स्त्रीवादी कविता करते.

स्त्रीचा विविध पातळ्यांवर होणारा कोंडमारा प्रभावीपणे काव्यमाध्यमातून व्यक्त करणे, स्त्रीच्या दुय्यम स्थानाची जाणीव जागृत करणे, पुरुषाच्या स्वामित्वाच्या हक्काचा फोलपणा दाखवणे, बौध्दीक व शारीरिकदृष्ट्या स्त्री पुरुषांपेक्षा कमकुवत नाही हे सिध्द करणे इ. अनेक दृष्टीकोनातुन एकविसाव्या शतकातील मराठी कवयित्री समर्थ अविष्कार मराठी स्त्रीवादी कवितेतून मांडताना दिसतात. त्यात सिसिलिया कार्व्हालो, नीरजा, आसावरी काकडे, कविता महाजन,

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

ISBN-978-93-5240-495-9

मीनाक्षी पाटील, मलिका अमर शेख, ज्योती लांजेवार, अश्विनी धोंगडे, प्रज्ञा पवार, अंजली पेंडसे, रजनी पुर्ळेकर अशा कितीतरी कवयित्री स्त्रीवादी जाणिवेतून काव्यलेखन करताना दिसतात.

एकविसाव्या शतकात काव्यलेखन करणाऱ्या स्त्रीवादी कवींच्या काव्यात घराच्या अदिवंधात्मक जाणिवेचा अविष्कार तीव्रतेने होतो. घराच्या कल्पनेभोवती गुंफलेल्या कवयित्री मनाच्या जाणिवांना अनेक संदर्भ आहेत. आदर्श रुपात स्मृतिनिधीमध्ये टिकून राहिलेलं माहेरचं घर, त्या आदर्श रुपापासून लांबवर गेलेले सासरचे घर आणि या दोन्ही घरामधून बाहेर पडण्यास सतत खुणावणारे तिसरे स्वप्नातील घर या वास्तवाचे नेमके भान आसावरी काकडे यांनी व्यक्त केले आहे.

"ऐन पावसाळ्याच्या सुरुवातीला
तु हे काडयांचं घरट बांधलंयस
गृहीत संकटांच्या झुलत्या फांदीवर
आणि निशंक, भरारी घेतो आहेत आकाशात दूरवर !...
जगत्या क्षणांचे मोती भूतभविष्याच्या धाग्यात न गुंफता
मोकळेपणानंच टिपून घ्यायचं कसब कुणी शिकवलं तुला."?

घरातच रमून आपली पारंपरिक प्रतिमा जपणारी स्त्री दाराबाहेर उडी घेऊन पाहण्याची लागलेली आसोशी कवयित्री सहजपणे व्यक्त करते. ' घरातल्या चार सुशोभित वस्तू प्रमाणे, मी एक तुला प्रेम करायला आणलेली वस्तू नाही.' असे ती बजावते. तसेच 'तुझ्या दिव्याच्या लख्ख उजेड नसता नाही वाट स्वच्छ दिसत असल्याची ' जाणीव ती तीव्रपणे व्यक्त करते, सगळ्यांचं करता करता स्वतःला ओळखलं नाही ही कुरतडणारी जाणीव, स्वतःच घर हाच कोंडमारा होणं, एकरुप होतानाही जाणवणारं स्वतःच वेगवेळपण याचे अनेक संदर्भ या कवितेत येतात.

बाहेरच्या जगातील संघर्षांना तोंड देणाज्या या स्त्रीचं घरातलं आयुष्यही तेवढंच संघर्षमय झालं आहे. कधी या संघर्षाचं अंतिम टोक म्हणुन वेगळं राहणं तिच्या नाशिबी येतं, तर कधी कुटूंबात राहूनही प्रचंड एकटेपणा तिच्या वाट्याला येतो. घरकामाचा प्रचंड ताण, उगीनिगीचे स्वैपाकपाणी, परंपरा, पाहुणे - रावळे, सणावर, नवऱ्याचा धाक, मुलांच्या तिच्याकडून अपेक्षा या सगळ्यामुळे भरडून निघालेली आणि त्यात स्वतःला हरवुन बसलेली स्त्री प्रतिमा या कवितांमधून प्रभावीपणे येत नीरजाने विझलेल्या घरांचे चित्र रेखाटले आहे.

एकदा येऊन जा ह्या सुर्य विझलेल्या घरांपाशी
प्रत्येक घराच्या वळचणीला टांगुन ठेवली आहेत

ISBN-978-93-5240-095-9

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin 431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

लडकतरे पहिल्या बलात्काराची अन् पलंगाच्या वर पोस्टरे

प्रतिष्ठित बुरख्यांनी भुईसपाठ केलेल्या आयुष्याची.

घरट्या कल्पनेचा समग्र विद्रोही निबेध नीरजाच्या काव्यात अनेक संदर्भात प्रकट झालेला आहे. त्यामुळेच 'कालीच्या उग्र विध्वंसक रुपाचा साक्षात्कार घडविणारी नीरजाची कविता मराठी काव्यात अनन्यसाधारण ठरणारी आहे.' असे रा.ग.जाधव यांनी म्हटले आहे. 'घर' या सकल्पनेचा निवारा हा अर्थ जाऊन आता 'पिंजरा' हा अर्थ एकेविसाव्या शतकातील स्त्रीवादी कवितेत येऊ लागला आहे. कारण निवाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी झगडणऱ्या व्यक्तीला आता चार भिंतीतील मोकळेपणाला अटकाव करणारी असुरक्षितता जाणवू लागली आहे. प्रेम करणे म्हणजे झोकुन देणे हे खरे असले तरी डोळे मिटुन आंधळेपणा स्वीकारल्याची खंत आता नव्या प्रेमकवितेत दिसु लागली आहे. त्यामुळे प्रियकर हा 'सखा' किंवा 'जोडीदार' आहे, आणि त्याच्या स्वातंत्र्योतकेच तिचं स्वातंत्र्य तिला दिसू लागले आहे.

स्त्री-पुरुषसंबंधातील भावगर्भ पदरांचे प्रत्ययकारी दर्शन एकेविसाव्या शतकातील स्त्रीवादी कवितेत घडते. स्त्रीपुरुषसंबंधात स्त्रीदेहाचे सौदर्य व आकर्षण ह्या घटकालाही महत्व असते. तथापि स्त्रीची देहविशिष्टता ही तिच्या यातनामय जिण्याचे निमित्त होऊ शकते. त्यामुळेच मलिका अमर शेख या स्त्रीदेहाबद्दलच उद्वेगजनक अविष्कार घडवतात.

रज:स्वला, संभोग, बाळंतपण

शरीराभोवती फिरलेलं

आयुष्यासकट माणसाचं चक्र

मुक्या वेदनांचं वेटोळ.

प्रेम या विषयाकडे ही अनेकविध स्वतंत्र दृष्टीकोनातुन पाहता येते याची जाणीव या कवयित्रीमध्ये आहे. म्हणुनच स्त्री - पुरुषांमधील परस्परांना जिंकण्या - हारण्याची स्पर्धा, स्त्रीचे शारीरिक व मानसिक पातळीवरचे होणारे मुकाट शोषण, स्त्री - पुरुष संबंधातील बेबनाव फसवणुक आणि विश्वासघात याचे चित्रणही या कवितेत येते. एखाद्या अनुभवाच्या चटक्यातून जागं होणारं स्त्रीत्व आणि स्वत्व याचे भान ही कविता व्यक्त करते.

गडद अंधारात सावलीसारखे

मागे लागलेले हे भोग

तु उंच झाडाच्या शेंड्यावर आलेलं

लालचुटूक फळ

आणि हा किडा डबक्यातला

Sonpeth
Pin-431516
Late Ramesh ...
Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN-978-93-5240-095-9

बुंध्याशी बसुन
तुझ्याकडे पाहत होता त्यावेळी
आज तु दिलेला हाडुक चघळत
भुंकतो आहे तुझ्याच दारात.

उंच झाडावरच फळ आणि डबक्यातला किडा या दोन प्रतिमा पुरुष व स्त्रीच्या जीवनातील असमानता आणि प्रेम नामक कल्पनतेला भ्रमनिराश पुरेशा समर्थपणे व्यक्त करतो. आश्विनी धोंडगे याचा एक मार्मिक व विलक्षण अर्थपूर्ण अभिप्राय उल्लेखनीय आहे.

तो आरशात जसा असतो तसा दिसतो.
ती आरशात जशी नसते तशी दिसते.

पुरुषप्रधान मनुष्यसंस्कृतीच्या आरशात स्त्री स्वतःचे खरे प्रतिबिंब पाहूच शकत नाही, किंबहुना त्या संस्कृतीला इष्ट वाटणारे पण खरे नसणारे असे स्त्रीचे रुपच तेवढे त्या आरशात प्रतिबिंबित होते, असा हा स्त्रिवादी अभिप्राय धोंडगे यांनी दिला आहे.

एकविसाच्या शंतकातील स्त्रीवादी कवितेत महानगरीय संवेदनाही अविष्कृत होतात. या कवयित्रींनी केवळ कवितेचा विषय म्हणुनच महानगराकडे पाहिले आहे असे नाही, तर महानगरीय वास्तवाचा कमी - अधिक प्रभावही त्यांच्या सर्जनशील संवेदनशीलतेवर झाल्याचे दिसून येते. रजनी  परुळेकर, नीरजा, मलिका अमर शेख, आसावरी काकड, प्रज्ञा पवार इत्यादी कवत्रियी तर शहरी पर्यावरणाशी निगडीत आहेत. त्यामुळे त्यांच्या आशयविषयांत प्रतिमासृष्टीत, अस्तित्वभानात महानगराचा ठसा जाणवतो एका संवेदनशील सुशिक्षित महानगरीत स्त्रीच्या भावना या कवितेतून अविष्कृत होतात. यातनांच्या महापुरात सापडलेली, संपल्यात जमा असलेली, लेडीज स्पशेलमध्ये निमुट प्रवास करणारी, निरस जीवन जगणारी आणि थकुन मागुन घरी येणारी ही महानगरीय स्त्री आहे. शहरी जीवनानं एकुणच आयुष्य नासवुन टाकले, आणि त्यातही दारिद्र्य, वेश्याव्यवसाय, झोपडपट्टीतले भणंग आयुष्य यात खितपत पडलेल्या स्त्रीचे आयुष्य तर चिंध्या होऊन गेले. स्त्रीचे शरीर हेच तिचं वैरी होतं आणि या पिंजऱ्यातुन उडून, त्याविना जगणं हेच अशक्य होऊन बसते. अशी जाणीव मलिका अमरशेख 'वादळ' या कवितेतुन व्यक्त करतात.

माझ्या तारुण्याचं रेशमी वस्त्र
चोचीत घेऊन माझा प्रियकर केव्हाच उडून गेला
तरीही मी अजून माझं शरीर
जिवन वापलीय

ISBN: 978-93-5240-095-9

Sonpeth Pin-431516

नैराश्य हा पहिला मृत्यू असतो

अन् मला तो नकोय —

...गतीने बदलत जाणाऱ्या महानगरांमधले पुरुषांबरोबरीने स्त्रीचेही आयुष्य करपतंय ... येणाऱ्या जीवनात हास्यपद ठरावेत ...प्रेम, श्रद्धा, समर्पण, रोमँटिकपणा हे शब्दसुद्धा ... नवीन अर्थांनी अलंकृत इतके जीवनाचे यांत्रिकीकरण झालंय. हुंडा, बलात्कार, हुंडाबळी ... आहे. शिक्षणाबरोबर स्वतःच समाजला स्त्री बळी पडतीय. जीवनातली असुरक्षितता वाढली आहे. ... आत्मसन्मान जपण्याची अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी विचारवंत स्त्रीलाही कुटुंबाशी झगडुन ... वेळ आली आहे. महानगरीय संस्कृतीत पुरुषांच्या वासनांना बळी पडलेल्या स्त्रियांचे नकळी शरीर आणि मन त्वेषाने बंड करून उठते.

आमच्या आयुष्याच्या नाक्यानाक्यावर
वासुगिरी करणारे तुमचे लंपट शब्द
इथल्या प्रत्येक आईच्या पदर
असंख्य जळवांनी भरलेला.

पुरुषी वर्चस्वाला, स्त्रीला बळी पाडणाऱ्या या परिस्थितीला संपवायचंय, उखडून टाकायचंय असा आवेग एकेविसाव्या शतकातील स्त्रीवादी कवितेतून होतो.

एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कविता आधुनिक स्त्रीच्या बदलत्या प्रतिमा ठळकपणे व्यक्त करत आहे. इतिहासाने स्त्रियांनाच स्त्रीयांवर अन्याय करायला भाग पाडले हा इतिहास म्हणजे सुडचक्र आणि इतिहासदत्त असे सुड घेण्याचे काम स्त्रीवर सोपवलेले. परंतु आत्मभान प्राप्त झालेली आधुनिक स्त्री या या विरोधात बंड करते. मलिका अमरशेख नेटकेपणाने व अभिनव जाणीव व्यक्त करतांना म्हणतात.

सरते शेवटी मीही एका सुडचक्राच अपरिहार्य चक्र होते
जे माझी इच्छा नसतांना माझ्याजवळ येऊन थांबलं होत.
आणि आता मला हेच समजेनासं झालंय
की मी चक्र थांबवणारा हात आहे
की चक्राला गती देणारा मध्यबिंदू ?

सुडचक्राचा हा इतिहास चालू ठेवायचा की तो कायमचा गाडून टाकायचा असा प्रश्न ती विचारते. कवयित्री निरजानेही हाच प्रश्न स्वतःला व समग्र स्त्रीजातीला विचारला आहे. 'माझ्या शब्दांची तरवार मी परजायची की हातच छाटुन घ्यायचे असा व एवढाच प्रश्न आहे.' असे त्या म्हणतात. कसल्याही प्रकारची तडजोड न स्वीकारणारा हा स्त्रीवादी विद्रोह आहे ... दृष्टीकोनावर हल्ला चढवताना

ISBN-978-93-5240-095-9

त्या म्हणतात.

"रस्त्याच्या मधोमध कोसळलेल्या विवस्त्र बाईच्या अंगावर
घालावी एखादी चादर असं वाटत नाही कुणालच अलीकडे;
तिच्या स्तनातुन पाझरणाऱ्या रक्ताची चिळकांडी
उडेल आपल्या चारित्र्यावर
म्हणून माणसं उभी आहेत दूर
भयाच्या अडोशानं."

माणसांच्या संकुचित मनोवृत्तीवर त्या टीका करतात. माणसांच्यात केवळ 'मी' पुरती सोयीची ठरणारी मानसिकता अधिक वाढत आहे. 'आम्ही' च्या रूपातील मानवतावादी व्यापक समुहभाव, संवेदनशीलता कमी होत आहे ही वस्तुस्थिती शब्दद्ध केली आहे. इतरांच्यासाठी संकटांना सामोरे जाण्याची मानसिकता जबाबदारी अंगावर घेण्याची मानसिकता कमी होत चालली आहे, ही समकालीन वस्तुस्थिती नोंदवली आहे.

थोडक्यात एकेविसाव्या शतकातील स्त्रीवादी कवितेत येणारी स्त्री पारंपरिक भूमिका नाकारुन स्त्री - मुक्तीच्या नव्या वाटा शोधणारी बंडखोर स्त्री आहे. सावित्री ही पतिव्रतेची पारंपरिक प्रतिमा झुगारुन ती मतलबी सत्यवानाचा कडवट निषेध करते. इतकेच नव्हेतर वात्सल्यात जन्मभर अडकून पडलेल्या आईची प्रतिमा धिकारुन स्वैर मोकळी झालेली आधुनिक स्त्री एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कवितेत सापडते. याही पुढे जाऊन पवित्र आणि योनी सुचिता या जुनाट मूल्यांना मूठमाती देणारी धाडसी स्त्री, ज्यात स्त्रीपूर्ण मुक्त आहे. अशी नवी संस्कृती तिला निर्माण करायची आहे. स्वतःच्या स्वंतत्र्य व्यक्तिमत्वाची जाणीव झालेली संवेदनाक्षम स्त्री एकेविसाव्या शतकातील स्त्रीवादी कवितेत सापडते.

**संदर्भ ग्रंथ :**


१. आधुनिक मराठी कवयित्रींची कविता - रा. ग. जाधव

२. स्त्रीवादी समीक्षा : स्वरुप आणि उपयोजन - डॉ. अश्विनी धोंडगे

३. समकालीन मराठी कतिता : एक निरीक्षण - प्रकाश देशपांडे, केजकर

४. मराठी लेखिका : चिंता व चिंतन - डॉ. भालचंद्र फडके


◈◈◈

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani